महाराष्ट्र शासन

क्रमांक: एमएसएस १०९२/३३२०/माशि-१
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
दिनांक: २९ फेब्रुवारी, १९९३.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई/
नाशिक/पुणे/कोल्हापूर/औरंगाबाद/नागपूर/अमरावती.

विषय:- १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून, सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, १९९२ पासून विना अनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थांना अनुदान संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे:-

अ] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] शासन निर्णय, शिक्षण व सेवा योजन विभाग, क्रमांक: एमएसएफ १०८८/१६६९/एन माशि-१, दिनांक १०.२.१९८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सूत्रानुसार अनुदान अनुज्ञेय आहे.

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थाची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

२..

१. संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२. संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

४. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच सदर माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पुर्ण करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास त्वरित पाठविण्यात यावा.

[ द. रा. माळी ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षणाधिकारी, [माध्यमिक], जिल्हा परिषद,
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. शिक्षण उपमंत्री यांचे खाजगी सचिव.
सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
निवड नस्ती.

एसआर

जिल्हा पुणे

| १. | २. | ३. | ४. | ५. |
|---|---|---|---|---|
| १. | श्रम शिक्षण प्रसारक मंडळ | माकूर्डे ता. पुरंदर | आठवी | मराठी |
| २. | महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी, हुजूरपागा, पुणे | कात्रज पुणे | आठवी | मराठी |
| ३. | श्री. भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ | किवळे ता. खेड | आठवी | मराठी |
| ४. | राजगड ज्ञानपिठ, भोर, पुणे | करंदी [बु.] ता. भोर | आठवी | मराठी |
| ५. | भोरवेल्हे तालुका कृषी औद्योगिक विकास मंडळ, भोर [राजगड ज्ञानपीठ] | टिटेघर ता. भोर | आठवी | मराठी |
| ६. | भोर वेल्हे तालुका औद्योगिक विकास मंडळ, भोर [राजगड ज्ञानपीठ] | आळंदे ता. भोर | आठवी | मराठी |

—— X ——